# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक ११६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ

परिपत्रक

क्र.:- २/एनजीपी/(संस्था-पाठयक्रम बदल)/२०१६/८१९
दिनांक : 22 JUN 2016

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा : १) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५
२) शासन अधिसूचना क्रमांक टीईएम - २०१५/सीआर २३६/टीई-४, दि. ११.०३.२०१६
३) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचे पदवी व पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश नियम
४) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि. ०८.०६.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतीवृत्त

विषयांकीत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व तत्पुर्वीच्या शैक्षणिक वर्षातील कार्यपध्दतीनुसार या कार्यालयाकडून व या कार्यालयाच्या अधिपत्याखालील तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयांमार्फत कार्यवाही करण्यात येत होती. परिणामी या संचालनालयाकडे विद्यार्थी /पालक पाठयक्रम किंवा संस्था बदल करण्याच्या अनुषंगाने चौकशी करत असल्याने याबाबत खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करण्यात येत असून त्याअनुषंगाने वरील अधिसूचना व प्रवेश नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रथम वर्षाचा अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर पाठयक्रम किंवा पाळी किंवा संस्था बदलण्याची तरतूद व कार्यपध्दती उपरोक्त नियमावलीमध्ये करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याची तरतूद व कार्यपध्दती सदर नियमावलीमध्ये आहे. तरी राज्यातील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयाच्या प्राचार्य / संचालकांना कळविण्यात येते की, वरील क्रमांक २ व ३ च्या मधील पाठयक्रम किंवा संस्था किंवा पाठयक्रमांसह संस्था बदल करण्यासाठीच्या नियमांतील तरतुदींचे काटेकोर पालन करुन खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर संस्थेअंतर्गत पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या उमेदवाराला ,जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची कार्यवाही संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य निश्चित करुन करावी. मात्र विद्यार्थी जो पाठयक्रम बदलून घेणार आहे त्या पाठयक्रमासाठी संबंधित विद्यापीठाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची असून अशा बदलांची सूची त्यांनी मा. आयुक्त तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाला तात्काळ कळविण्यात यावी.

२. विद्यार्थ्यांचे संस्था, संस्था व पाठयक्रम बदल मा. आयुक्त तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येणार नाहीत. याबाबत विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेत संस्था, संस्था व पाठयक्रम बदलासाठी विनंती केली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी सध्या शिक्षण

घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, स्थलांतरीत करावयाची संस्था ज्या विद्यापीठाशी संलग्नीत असेल त्या विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र, रिक्त जागा व तद्अनुषिक दस्तावेजासह त्यांचे शिफारशीसह प्रस्ताव मा. आयुक्त तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करुन याबाबत पुर्वमान्यता घेण्यात यावी.

३. अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षासाठीच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेसाठी अभ्यासक्रम निहाय जागा प्रसिध्द करण्यापुर्वी अ.क्र. १ व २ मधील कार्यवाही करण्यात यावी. तद्नंतर कार्यवाही केल्यास प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक जागेवर बदली झाल्यास नियमानुसार दंडनिय कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संस्था प्रमुखांनी व्यक्तीश: नोंद घ्यावी.

४. राज्यातील अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी अभ्यासक्रमांच्या सर्व विनाअनुदानित संस्थांच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, संस्था बदल, पाठयक्रम बदल, सस्था व पाठयक्रम बदल इ. बाबत मान्यतेची कार्यवाही <u>मा. आयुक्त तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, मुंबई ४०० ०५१</u> यांचे स्तरावर होणार असल्याने याबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात येऊ नयेत.

५. संस्था, संस्था व पाठयक्रम बदलास विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेत विंनती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतची कार्यवाही करावयाची असून त्यासाठी विद्यार्थी किंवा पालक यांना मा. आयुक्त तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०५१ यांचे कार्यालयात व्यक्तीश: पाठवू नये.

६. शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या पदवी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या पाठ्यक्रम किंवा संस्था किंवा संस्था व पाठ्यक्रम बदलाबाबतच्या कार्यवाहीचे निर्देश स्वतंत्ररित्या संबंधित शासकीय व शासन अनुदानित संस्थाना कळविण्यात येतील.

७. विषयांकीत प्रकरणी कार्यवाही करतांना संदर्भ क्रमांक २ व ३ मधील संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील तरतुदी /नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करतांना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य व्यक्तीश: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

या संदर्भातील अधिक माहिती वा मार्गदर्शक सूचनांसाठी मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे कार्यालयाकडे संपर्क साधावा

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीसाठी सादर :

<u>तात्काळ</u>

**सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती**
जा.क्र. विकाअ/शिक्षण/सुनावणी/२०१३/ 2269
दिनांक 22 JUN 2016

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व सबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित/अशासकीय विनाअनुदानित संस्था, अमरावती विभाग.

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.